**कला, वाणिज्य आणि विज्ञान महाविद्यालय, गडहिंग्लज**
**अर्थशास्त्र विभाग,**
**संशोधांनाचे अर्थशास्त्र, बीए भाग ३, सेमिस्टर नंबर ५,**
**"नोट्स"**
**विषय शिक्षक :डॉ. काशिनाथ रामचंद्र तनंगे (८०५५८०८७७२)**

## प्रश्न ४. अर्थशास्त्रीय संशोधनाचे क्षेत्र:(Areas of Economic Research)

- प्रस्तावना:

आधुनिक काळात विशेषतः औद्योगिक क्रांतीनंतर व्यक्तीचा आणि राष्ट्राच्या ही जीवनात पैशाला अनन्यसाधारण असे महत्त्व प्राप्त झाले. पैशाचा प्रभाव सर्वत्र वाढत गेला. व्यक्तीच्या व राष्ट्राच्या हाती असलेले पैसा एक प्रभावी शस्त्र बनले. त्यामुळे अर्थशास्त्रीय संशोधनाला आधुनिक जगात मोठ्या प्रमाणात महत्व निर्माण झाले. आधुनिक काळातील जवळजवळ सर्वच मानवी व्यवहाराबाबत अर्थशास्त्रज्ञ संशोधन करीत आहेत. तथापि अर्थशास्त्रीय संशोधनाचे अभ्यासानुसार वर्गीकरण करणे व संशोधनाची क्षेत्र सांगणे शक्य आहे. अर्थशास्त्रीय संशोधन क्षेत्र खालील प्रमाणे..

### १) जनसंख्या शास्त्र:

देशातील प्रत्येक व्यक्ती बाबत माहिती दर दहावर्षांनी शासन गोळा करते त्याला जनगणना असे म्हणतात. जनगणनेमध्ये अर्थशास्त्रीय संशोधनाचे काम प्रचंड असल्यामुळे व त्याची उपयुक्तता मुख्यता सरकारला असल्यामुळे हे संशोधन सरकारतर्फे केले जाते. सरकार आवश्यक असणारी जवळजवळ संपूर्ण माहिती जनगणनेत मिळवण्याचा प्रयत्न असतो. जनगणनेमध्ये व्यक्तीचे उत्पन्न, शैक्षणिक पात्रता, राहते घर, इत्यादी प्रकारची माहिती जमा होतेच. त्याच बरोबर स्त्रियांची संख्या, पुरुषांची संख्या, लहान मुले, तरुण, वृद्ध यांची लोकसंख्या जनदर , मृत्युदर, लोकसंख्यावाढीचा वेग, धर्मानुसार व लोकसंख्या इत्यादी बाबतीत माहिती समजण्यास सरकारला मदत मिळते. यावरून देशातील जनगणना त्यांच्या माध्यमातून आवश्यक असणारी माहिती मिळवण्यासाठी अर्थशास्त्रीय संशोधन हे मदत करीत असते.

### २) लोकांची राहणीमान:

लोकांच्या राहणीमानाचा ही अभ्यास करण्यासाठी अर्थशास्त्रीय संशोधन पद्धती उपयुक्त ठरत असते. सरकारला आपल्या धोरणाचा लोकांच्या राहणीमानावर काय परिणाम झाला आहे हे समजून

घेणे आवश्यक असते. अधिकाधिक लोकांच्या अत्यावश्यक गरजा पूर्ण करणे हे सरकारचे कर्तव्य असते. लोकांच्या  गरजा भागवण्यासाठी व त्या विकत घेण्यासाठी त्याना  किती किंमत मोजावी लागेल हे समजण्यासाठी जीवनमान निर्देशांक काढला जातो. या निर्देशांकामध्ये लोकांच्या मूलभूत गरजासाठी किती किंमत मोजावी लागेल याची माहिती असते. जीवनमान निर्देशांक ठरवण्यासाठी अर्थशास्त्रीय संशोधन हे खूपच उपयुक्त ठरते.

### **३) बेकारी**:

बेकारी हा अर्थशास्त्रीय संशोधनाचा एक महत्त्वाचा विषय आहे. भारतासारख्या देशात बेरोजगारीचा प्रश्न हामहत्वाचा प्रश्न म्हणून ओळखला जातो. बेकारीचा अर्थ, बेकारीचे प्रकार, पुरुष गटातील बेकारी, स्त्रियांची बेकारी, सुशिक्षित बेकारी, अशिक्षित बेकारी, हंगामी बेकारी, छुपी बेकारी, उघड बेकारी, संघर्षात्मक बेकारी, अशा विविध प्रकारच्या बेकारी अभ्यास करण्यासाठी अर्थशास्त्रीय संशोधन उपयुक्त ठरते. शहरी आणि ग्रामीण भागातील बेकारींचा अभ्यास करण्यासाठी अर्थशास्त्रीय संशोधन उपयुक्त संशोधन म्हणून ओळखले जाते.

### **४) शेती क्षेत्राचा अभ्यास:**

भारतासारख्या विकसनशील देशात 64 टक्के लोकसंख्या आजही ग्रामीण भागामध्ये राहते. ग्रामीण भागातील लोकांचा शेती हा प्रमुख व्यवसाय आहे. शेती व्यवसायातील असणाऱ्या विविध समस्यांचा अभ्यास करण्यासाठी अर्थशास्त्रीय संशोधन खूप उपयुक्त ठरते. शेतकऱ्यांच्या समस्या, शेत जमिनीची कमी उत्पादकता,पीक संरचना, शेतकऱ्यांच्या आत्महत्या, आधुनिक तंत्रज्ञान, संकरित बियाणे, बाजारपेठांचा अभ्यास करण्यासाठी अर्थशास्त्रीय संशोधन महत्त्वाचे संशोधन म्हणून ओळखले जाते.

### **५) औद्योगिक क्षेत्र:**

देशामध्ये औद्योगिक क्षेत्र एक महत्त्वाचे क्षेत्र म्हणून ओळखले जाते. मोठे उद्योग, मध्यम उद्योग, लहान उद्योग, कुटिरोद्योग, असे उद्योगांचे विविध प्रकार दिसून येतात. उद्योगांना लागणाऱ्या कच्चामाल, तंत्रज्ञान, रोजगार, भांडवल, बाजारपेठ, गुंतवणूक,  वाहतूक यासारख्या विविध समस्यांचा अभ्यास करण्यासाठी अर्थशास्त्रीय संशोधन उपयुक्त संशोधन म्हणून ओळखले जाते.

### ६) बाजारपेठांचे संशोधन:

कोणत्याही व्यवसायामध्ये उत्पादन आणि विक्री या  दोघांनाही महत्त्वाचे स्थान असते. बाजारपेठेचे संशोधन हे सरकार कडून त्याचप्रमाणे खाजगी  उद्योजकांकडूनही केले जाते. लोकांच्या गरजा काय आहेत, ते किती वाढतील, कशा प्रकारे वाढतील, उत्पादनाचा दर्जा, किंमत पातळी याबाबत अपेक्षा काय आहेत, उत्पादनाच्या समस्या कोणत्या आहेत. वाहतुकीच्या समस्या कोणत्या आहेत, त्या कशा सोडवता येतील, बाजारपेठेतील स्पर्धा इत्यादी प्रश्नांची सोडून करण्यासाठी अर्थशास्त्रीय संशोधन उपयुक्त ठरते.

### ७) आयात-निर्यात:

अर्थशास्त्रीय संशोधनामुळे आपणास आंतरराष्ट्रीय व्यापारातील आयात-निर्यात ची कल्पना येण्यास मदत होते. आपण कोणकोणत्या देशाकडून आयात करतो, कोणकोणत्या देशांना निर्यात करतो, कोणत्या वस्तूंची आयात करतो, कोणत्या देशात आयात करतो, कोणत्या देशाकडून आयात करतो, कोणत्या वस्तूंची निर्यात करतो कोणत्या देशांना निर्यात करतो,  एकूण निर्यातीचे प्रमाण काय आहे, इत्यादी. आकडेवारी प्रत्येक राष्ट्राला तयारी ठेवावी लागते. राष्ट्राच्या प्रगतीसाठी ही आकडेवारी खूप उपयुक्त ठरते. आयात-निर्यातीची आकडेवारी परराष्ट्रीय धोरणाशी संबंधित असते. या आकडेवारीवरून आपले मित्र राष्ट्र आणि आपले शत्रू राष्ट्र हे ठरत असतात. त्यामुळे देशाच्या आयात-निर्यातीचा सखोल अभ्यास करण्याचे क्षेत्र म्हणून अर्थशास्त्रीय संशोधन ओळखले जाते.

### ८) बँकिंग व्यवस्था:

राष्ट्राच्या विकासात बँक महत्त्वाची कामगिरी पार पडत असतात. देशातील बँकेची संख्या, बँकांच्या ठेवी, बँकांनी दिलेली कर्जे, बँकांकडे असणारे भांडवल, बँकानी  दिलेले अनुदान, बॅकांची अनुत्पादित मालमत्ता यासारख्या विविध माहितीचे संकलन करण्यासाठी अर्थशास्त्रीय संशोधन पद्धती उपयुक्त ठरत असते. बँकिंग व्यवस्थेचा संशोधनात्मक अभ्यास केल्यामुळे बँकिंग व्यवस्थेची सद्यस्थिती समजण्यास मदत होते.

### ९) संपत्तीचे वितरण:

देशामध्ये संपत्तीचे वितरण हे समान झाले तर आर्थिक विषमता निर्माण होत नाही. पण भांडवलशाही देशांमध्ये मोठ्या प्रमाणात संपत्तीचे केंद्रीकरण होताना दिसून येते. त्यामुळे एका बाजूला काही लोकांच्याकडे प्रचंड पैसा व बहुतांशी लोक गरीब अशी स्थिती दिसून येते. यातूनच देशात

आर्थिक विषमता निर्माण होते. अशावेळी संपत्तीचे वितरणाचा अभ्यास करण्यासाठी अर्थशास्त्रीय संशोधन खूप उपयुक्त ठरते. देशांमध्ये संपत्तीचे निर्मिती दरवर्षी कोठे आणि किती प्रमाणात होते, संपत्तीचे वितरण समाजाच्या निरनिराळ्या घटकात कसे झालेले आहे, याचा अभ्यास करण्यासाठी अर्थशास्त्रीय संशोधन खूप उपयुक्त ठरते. संपत्तीचे विषम वाटप आणि त्याचे समाज व्यवस्थेवर होणारे प्रतिकूल परिणाम समजावून घेण्यासाठी अर्थशास्त्रीय संशोधन महत्त्वाची भूमिका बजावत असते.

**१०) सैद्धांतिक:**

सैद्धांतिक क्षेत्रात हे अर्थशास्त्रीय संशोधन तो उपयुक्त ठरत असते. गतिमान अर्थव्यवस्थेत व्यक्ती, समाज, राष्ट्र आणि संपूर्ण अर्थव्यवस्था यामध्ये सातत्याने बदल होत असतो. बदलत्या परिस्थितीनुसार सिद्धांताशी बदल होत असतात. बदलणाऱ्या परिस्थितीवर केल्या जाणाऱ्या सिद्धांत यांचाही अभ्यास अर्थशास्त्रीय संशोधनामध्ये केला जातो.

- **सारांश:**

आधुनिक काळात विशेषतः औद्योगिक क्रांतीनंतर संपूर्ण जगातील राष्ट्रांची स्थिती बदलेली दिसून येते. आर्थिक विकासाचे महत्त्व प्रत्येक देशासाठी महत्त्वपूर्ण ठरलेल्या आहे. मानवाने लावलेल्या पैशात अनन्यसाधारण असे महत्त्व प्राप्त झालेले आहे. प्रत्येक देश आपला आर्थिक विकास साध्य करण्यासाठी प्रयत्न करतो आहे अशा अवस्थेत देशाच्या अर्थव्यवस्थेचे परिपूर्ण अभ्यास करण्यासाठी अर्थव्यवस्थेला गतिमानतेकडे नेण्यासाठी अर्थशास्त्रीय संशोधन पद्धती उपयुक्त दिसत आहे. अर्थशास्त्र आणि इतर शास्त्र यांच्यामध्ये समन्वय साधून समाजात परिपूर्ण बांधणी करण्यामध्ये अर्थशास्त्रीय संशोधन हा उपयुक्त संशोधन म्हणून ओळखले जाते.